जा.क्र. प्राअवि/एनसीटीई/२००५-०६/३४-ट/२९६६
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन
व प्रशिक्षण परिषद, पुणे ३०.
दिनांक :- ४.७.२००५
१२

प्रति,
सचिव/अध्यक्ष/प्राचार्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 122255 | HAJI JAN MOHAMMED MOTIWALA IQRA , JR. COLLEGE OF EDUCATION, C/O AL-IRFAN RESIDENTIAL SCHOOL, SULI BHANJAN, KHULTABA AURANGABAD 431101 MAHARASHTRA | D.ED. (Urdu) | 50 | 2005-2006 |

विषय :- **सन २००५-०६ या वर्षाकरिता नवीन/अतिरिक्त तुकडीस अध्यापक विद्यालयास एन.सी.टी.ई. च्या मान्यतेबाबत**

संदर्भ :- एन.सी.टी.ई. भोपाळ यांचे पत्र क्र. डब्ल्यूआरसी/२-३२/ ७४/२००५/५०३०
दिनांक , २७.६.०५, १४.६.०५

वरील संदर्भीय पत्रान्वये एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी आपल्या अध्यापक विद्यालयास सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या विद्यालयात कार्यरत असलेले प्राचार्य व प्राध्यापक यांची माहिती शिक्षण उपसंचालक यांच्याकडून प्रमाणित करुन व त्यावर संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांची स्वाक्षरी घेवून एन.सी.टी.ई. भोपाळ यांच्याकडे पाठविण्याच्या अटीवर ५० प्रवेश क्षमतेस नवीन मान्यता/~~अतिरिक्त तुकडीस मान्यता~~ दिलेली आहे. एन.सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी. प्रवेशाच्या वेळी प्रवेश प्रचलित शासन धोरणानुसार या परिषदेमार्फत करण्यात येतील. प्रवेशाच्यावेळी प्रवेशाबाबत संबंधित जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण व संस्थेशी संपर्क साधून त्यांच्याकडून आवश्यक ते मार्गदर्शन घ्यावे. त्याचप्रमाणे डी.एड्. विनियमन प्राधिकरण, पुणे (व्दारा - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०) यांचेकडून शैक्षणिक शुल्क मान्य करुन घ्यावे. शुल्क मान्य करुन घेतल्याखेरीज विद्यार्थ्यांकडून फी आकारु नये.

संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे ३० करिता.

प्रत : १. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२. विभागीय शिक्षण उपसंचालक औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था औरंगाबाद यांना पुढील कार्यवाहीसाठी.
४. संचालक, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७ डॉ.आंबेडकर मार्ग, पुणे-१